# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.01.2026 वार:गुरुवार**

---

1. सिडबीला उद्योगवाढीसाठी निधी देण्याला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
2. दावोस परिषदेत तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण विकास केंद्राची घोषणा
3. देशातल्या कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी गुंतवणूक
4. पुणे ग्रँड टूर सायकलिंग स्पर्धेत चीनच्या ल्यूक मडग्वेचा सलग दुसरा विजय आणि
5. वीस षटकांच्या पहिल्या सामन्यात भारताची न्यूझीलंडवर 48 धावांनी मात

**केंद्रिय मंत्रीमंडळ**

केंद्रिय मंत्रीमंडळानं भारतीय लघु उद्योग विकास बँक म्हणजेच सिडबीला पाच हजार कोटी रुपये समभाग निधी देण्याला मंजूरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. वित्तसेवा विभागाकडून तीन टप्प्यांत हा निधी सिडबीकडे हस्तांतरित करण्यात येईल. या निर्णयाचा सुमारे 25 लाख 74 हजार नवीन लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योजकांना फायदा होईल अशी अपेक्षा आहे. तसंच मार्च 2028 पर्यंत 1 कोटी 12 लाख रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज आहे. अटल निवृत्ती वेतन योजना 2030-31 पर्यंत सुरू ठेवण्याला आणि त्याच्या प्रचार तसंच विकासासाठी आर्थिक मदतीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

**मुख्यमंत्री-दावोस**

जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीनिमित्त आयोजित दावोस दौरा राज्यासाठी ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्याचा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल दावोस इथं वार्ताहरांशी बोलत होते. तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून यावेळी रायगड-पेण विकास केंद्राची घोषणा करण्यात आली. याबाबत माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले......

**पहिल्यांदाच आपण रायगड पेण ग्रोथ सेंटर लॉन्च केलेलं आहे. रायगड पेण ग्रोथ सेंटर हे आपल्या नवी मुंबई एअरपोर्ट पासून पंधरा ते वीस किलोमीटरच्या अंतरावर आहे. याच्यामध्ये गेल्या तीन चार पाच वर्ष आपण म्हणजे मी माझ्या मागच्या रेजिमपासून काम करत होतो. आणि आता त्या सगळ्या परवानग्या आपण घेतलेल्या आहेत रेडी टू स्टार्ट प्लग अ प्ले अशा पद्धतीनं आता हे ग्रोथ सेंटर आहे. हे पहिलं असं ग्रोथ सेंटर असेल किंवा देशातला पहिला प्रयोग असेल की ज्याच्यामध्ये जी कंपनी तयार करण्यात आलेली आहे. ही पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप आहे आजच**

**जवळपास एक लाख कोटी रुपयांच्या इन्व्हेस्टमेंट्स या सगळ्या वेगवेगळ्या कंपन्यांनी त्या ठिकाणी करण्याचं आज एमओयू केलेलं आहे. हा सगळा एफडीआय आहे आणि यातनं खूप चांगल्या पद्धतीनं एक नवीन शहर तयार होईल ज्याच्यामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीचे हायपेड जॉब्स तयार होतील आणि याचं सगळं प्लॅनिंग करताना वॉक टू वॉकचं प्लॅनिंग आपण त्या ठिकाणी तयार केलेलं आहे. त्यामुळे मला असं वाटतं की आपण तिसरी मुंबई तयार करतोय ते तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर हे आपलं लॉन्च झालं.**

राज्यातल्या शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सुविधा पोहचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीनं यंदा दावोसमध्ये वैद्यकीय तंत्रज्ञानाबाबत चांगली आणि सकारात्मक चर्चा केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यातून राज्यातील आरोग्य सुविधांसाठीचा पथदर्शी आराखडा निश्चित करण्यात आल्याचं ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी काल जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांच्याशी राज्यात हरित औद्योगिक पट्टा विकसित करण्याच्या अनुषंगानं चर्चा केली. शासन आणि बँकेच्या सहकार्यातून राज्यातील धोरणात्मक आणि प्रभावी औद्योगिक विकासाला चालना देता येणार आहे. फडणवीस यांनी विविध देशांच्या नेत्यांशी तसंच उद्योग प्रतिनिधीसोबतही चर्चा केली. काल दावोसमध्ये प्रामुख्यानं धोरणात्मक सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये विविध विद्यापीठं आणि तंत्रशिक्षण संस्थांसोबतच्या करारांचा समावेश आहे.

**<u>वैष्णव-दावोस</u>**

दावोस इथल्या जागतिक आर्थिक परिषदेत कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी सात हजार कोटी अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक निश्चित झाल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. आयबीएम आणि मेटा या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर समाज माध्यमावरील संदेशाद्वारे त्यांनी ही माहिती दिली. कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान सज्जतेत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचं ठाम प्रतिपादन त्यांनी केलं. भारतातील स्टार्ट अप्सची वाढती संख्या, तसंच सेमी कंडक्टर उत्पादन, नॅनोमीटर तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रातील विकासाचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला.

**<u>जिल्हा परिषद निवडणूक</u>**

राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. आज अर्जांची छाननी होईल तर, 27 जानेवारीपर्यंत अर्ज मागं घेण्याची मुदत आहे. त्याच दिवशी अंतिम उमेदवार यादी जाहीर करुन चिन्ह वाटप करण्यात येईल. पाच फेब्रुवारी रोजी मतदान आणि 7 फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी एकत्रितरित्या लढणार आहेत. काल दोन्ही पक्षांच्या वतीनं पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. धाराशिव जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक महायुती एकत्रितपणे लढवणार असल्याचं आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितलं आहे.

**<u>मुंबई विद्यापीठ</u>**

मुंबई विद्यापीठात डॉ. आंबेडकर सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना होणार आहे. काल नवी दिल्लीत मुंबई विद्यापीठ तसंच सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयादरम्यान याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या

केंद्राच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोगासह विविध सरकारी स्पर्धा परीक्षा, परदेशी शिक्षणासाठीच्या पात्रता परीक्षा यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचं प्रशिक्षण, मार्गदर्शन, अध्ययनसामग्री तसंच वैयक्तिक सल्ला आणि समुदेशनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**गणेशजयंती-नवीमुंबई**

आज राज्यात गणेश जयंती अर्थात माघी गणेशोत्सव साजरा केला जात आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर उत्सवातील गणेशमूर्ती विसर्जनासाठी पारंपरिक 22 विसर्जन स्थळांजवळ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली आहे. या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये मूर्ती विसर्जन कराव्यात असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**प्रजासत्ताक दिन**

प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीतील कर्तव्य पथावर होणाऱ्या सोहळ्याची जोरदार तयारी सध्या सुरू आहे. देशाचं लष्करी सामर्थ्य, संस्कृती आणि वारसा यांचं दर्शन घडवणाऱ्या या सोहोळ्याच्या तयारीबाबतचा हा वृत्तांत...

**देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे स्फूर्तिगान असलेल्या वंदे मातरम गीताचं शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष ही यंदाच्या प्रजासत्ताक दिन सोहोळ्याची प्रमुख संकल्पना आहे. नवी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर होणाऱ्या दिमाखदार संचलनात, स्वतंत्रता का मंत्र-वंदे मातरम आणि समृद्धी का मंत्र -आत्मनिर्भर भारत या संकल्पना विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि मंत्रालयांच्या चित्ररथांमधून सादर केल्या जातील. प्रजासत्ताक दिनापर्यंत भारतीय सेनेची तीनही दलं, तटरक्षक दल आणि केंद्रिय सशस्त्र पोलिस दलाचे वाद्यवृंद देशभरात ठिकाठिकाणी वंदे मातरम गीताचं वादन करणार आहेत. एवढंच नाही तर प्रजासत्ताक दिन सोहोळ्याच्या निमंत्रण पत्रिकेचं आरेखनही वंदे मातरम गीताच्या संकल्पनेवर आधारित आहे. यंदा प्रथमच लष्करातर्फे लढाईसाठीची सैन्यरचना सादर केली जाणार आहे. वायू दलाची राफेल, सुखोई आणि अन्य विमानंदेखील चित्तथरारक कसरती सादर करणार आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी सुरेखा जोशी पुणे.**

**प्रजासत्ताक दिन स्पर्धा**

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय वाद्यवृंद स्पर्धेच्या अंतिम फेरीत राज्यातल्या दोन शाळांच्या पथकांनी प्रवेश मिळवला आहे. मुलांच्या गटात अहिल्यानगरमधल्या कोपरगाव इथल्या संजीवनी सैनिक शाळेची तर मुलींच्या गटात मुंबईच्या विक्रोळी इथल्या डॉन बॉस्को हायस्कूलची निवड झाली आहे. नवी दिल्लीच्या बाल भवनात येत्या शनिवारी अंतिम फेरी होणार आहे. तिन्ही संरक्षण दलांच्याप्रतिनिधींचा समावेश असलेली तज्ज्ञांची समिती अंतिम फेरीचं मूल्यांकन करेल.

**आर्टिलरी प्रात्यक्षिक-नाशिक**

नाशिकमधे देवळाली इथल्या लष्कराच्या तोफखाना प्रशिक्षण संस्थेत काल तोपची वार्षिक युद्धसराव प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. यावेळी नागरिकांनी बोफोर्स, धनुष्य, हॉवित्झर, वज्रसह आठ तोफा अन मल्टी

बॅरल रॉकेट लाँचरचा प्रहार आणि काही क्षणातच अचूक लक्ष्यभेद झाल्याचा थरार अनुभवला. भारतीय सीमा सुरक्षा दलाचे जवान प्रथमच या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी झाले.

**रेल्वे-नांदेड**

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या 350 व्या शहीदी वर्षानिमित्त नांदेडमध्ये येत्या शनिवारी आणि रविवारी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता रेल्वे प्रशासनानं 'ट्रेन ऑन डिमांड' सुरु केली आहे.

**पुणे ग्रँड टूर**

पुणे ग्रँड टूर-2026 सायकलिंग स्पर्धेच्या मराठा हेरिटेज सर्किट नावाच्या दुसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा सायकलपटू ल्यूक मडग्वे यानं सलग दुसरा विजय मिळवत 'यलो जर्सी'वरील आपलं वर्चस्व कायम राखलं. पुण्याच्या कॅम्प परिसरातील लेडीज क्लब इथून सुरु झालेला 105 किलोमीटरचा हा टप्पा सिंहगड रस्त्यावर नांदेड सिटी इथं संपला. डोंगराळ भूभाग, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाचे रस्ते यामुळे हा टप्पा सायकलपटूंच्या ताकद, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरला. स्पर्धेचा तिसरा 134 किलोमीटरचा टप्पा आज सासवड-पुरंदर ते बारामती दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. चौथ्या टप्प्यात उद्या बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर सायकलपटू शर्यत करतील. या अनुषंगानं पुणे आणि पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी आणि खासगी शाळा उद्या 23 जानेवारीला दुपारी 10 वाजेपर्यंतच सुरु ठेवाव्यात; त्यानंतर शाळांना सुटी द्यावी असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात काल पाच सामन्यांच्या मालिकेतील नागपूर इथं झालेला पहिला 20 षटकांचा सामना भारतानं 48 धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं अभिषेक शर्माच्या 35 चेंडूतील तडाखेबंद 84 आणि रिंकू सिंगच्या 20 चेंडूतील 44 धावांचा जोरावर पाहुण्यांसमोर 240 धावांचं आव्हान दिलं होतं. न्युझीलँडचा डाव 190 धावांवर संपुष्टात आला. ग्लेन फिलिप्स याने सर्वाधिक 78 धावा केल्या. शिवम दुबे आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. अभिषेक शर्मा याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

**हवामान**

उत्तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. अन्यत्र हवामान अंशतः ढगाळ, कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.